—: <u>प्रेसनोट</u> :—दिनांक : ०९/१२/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ४९/२०२१ |
| कलम | कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | विकास नामदेव लोखंडे, वय ३३ वर्षे, पोलीस उप निरीक्षक, एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, अंधेरी पुर्व, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु. १०,०००/— |
| स्विकारलेली रक्कम | रू १०,०००/— |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी यांचे विरुध्द एम.आय.डी.सी.अंधेरी पोलीस ठाणे मुंबई येथे गुन्हा दाखल असुन दाखल गुन्हयात अटक करुन लागलीच पोलीस स्टेशनला जामीन देण्यासाठी, कोर्टात न पाठवण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक यांनी फिर्यादी यांना प्रथम २०,०००/— रु. लाचेची रक्कम मागणी केलेबाबत फिर्यादी यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई येथे दिनांक ०८/१२/२०२१ रोजी तक्रार दिली होती.<br><br>सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०८/१२/२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान आरोपी लोकसेवक पोउनि विकास नामदेव लोखंडे यांनी तक्रारदार यांचेकडे तडजोडअंती १०,०००/— रु. लाचेची मागणी करुन स्वीकारण्याचे कबूल केले.<br><br>सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक पोउनि विकास नामदेव लोखंडे, यांना तकारदार यांचेकडून एम.आय.डी.सी पोलीस ठाणे, अंधेरी, मुंबई येथे रू. १०,०००/— लाचस्विकारताना रंगे हाथ पकडण्यात आले असून त्यांचे विरुध्द कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाकडे संपर्क साधावा.

<u>संपर्क</u> : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, ९१,सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई— ३०.

संकेतस्थळ – **acbmaharashtra.gov.in**

ईमेल :;**1) acbwebmail@mahapolice.gov.in, (2) addlcpacbmumbai@mahapolice.gov.in**

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन. **www.acbmaharashtra.net**

टोलफ्री क्र.१०६४

दूरध्वनी क्र.०२२—२४९२१२१२,फॅक्स क्र.०२२—२४९२२६१८,

व्हॉट्सॲप क्रमांक—९९३०९९७७००

( सुहास देशमुख )
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई